## नियमित दिवाणी दावा क्र. ४१०/२०१५ मध्ये निशाणी क्र. ४९ कडील अर्जावर आदेश

१) वादी क्र. २ रामचंद्र सिताराम पवार यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास परवानगी मिळण्याकरीता वादींतर्फे प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

२) वादींच्या प्रस्तुत अर्जातील कथनानुसार वादी क्र. २ रामचंद्र सिताराम पवार हे दिनांक १०/०९/२०१९ रोजी मयत झाले आहेत. वादी क्र. २ यांना प्रस्तुत अर्जात नमूद केल्याप्रमाणेचे वारस आहेत.

३) प्रतिवादी क्र. ७ ते ९ तर्फे प्रस्तुत अर्जास दाखल केलेल्या निशाणी क्र. ५१ कडील म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, मयत वादी क्र. २ हा वादी क्र. १ चा चुलता असून तो घरीच मयत झाल्यामुळे वादींना वादी क्र. २ च्या मृत्युची माहिती प्रथमपासूनच होती. अर्जातील कारण हे काल्पनिक व खोटे आहे. वादींच्या वागण्यामुळे दाव्याचे काम लांबणीवर पडलेले आहे. तसेच सदरचा अर्ज दाखल करण्यास वादींना अवाजवी विलंब झाला आहे व त्यामुळे अर्ज रद्द करण्यात यावा व अर्ज मंजूर करावयाचे मत झाल्यास वादींवर रक्कम रुपये ३,०००/- इतकी कॉस्ट करण्यात यावी.

४) प्रस्तुत अर्जाच्या कामी दोन्ही पक्षांतील विद्वान वकीलांचा युक्तीवाद ऐकला. रोजनाम्याचे व अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले.

५) वादींनी निशाणी क्र. ४५ कडे वादी क्र. २ रामचंद्र सिताराम पवार यांचे वारस रेकॉर्डवर घेण्यास झालेला विलंब माफ होऊन मिळण्याकरीता व निशाणी क्र. ४७ कडे अबेटमेंटचा हुकूम रद्द होऊन मिळण्याकरीता स्वतंत्र अर्ज दाखल केले आहेत व ते अर्ज न्यायालयाने मंजूर केले आहेत.

६) वादींनी निशाणी क्र. ५३ कडील यादीसोबत वादी क्र. २ रामचंद्र सिताराम पवार यांचे मृत्यू प्रमाणपत्र दाखल केले आहे. रामचंद्र सिताराम पवार

यांच्या मृत्यू प्रमाणपत्राचे अवलोकन करता असे दिसून येते की, रामचंद्र सिताराम पवार हे दिनांक १०/०९/२०१९ रोजी मयत झाले आहेत. वादींनी प्रस्तुतचा दावा हा दावा मिळकतीच्या हद्दी खुणा कायम करुन मिळण्याकरीता व निरंतर मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केला आहे. दाव्याचे स्वरुप विचारात घेता माझ्या मते मुळ वादी क्र. २ च्या मृत्युनंतर मुळ वादी क्र. २ च्या वारसांना Right to sue प्राप्त होतो. प्रकरणाचे स्वरुप विचारात घेता व अर्जातील नमूद कारणे विचारात घेता व वरील नमूद सर्व बाबी विचारात घेता माझ्या मते न्यायाच्या दृष्टीने प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब हे न्यायालय न्यायाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## आदेश

१) प्रस्तुत अर्ज खालीलप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

२) वादी क्र. १ व ३ ते ५ यांनी प्रस्तुत अर्जात विनंती केल्याप्रमाणेची योग्य ती दुरुस्ती वादपत्राच्या टायटल क्लॉजमध्ये करावी व त्यानंतर दुरुस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करावी.

३) वरीलप्रमाणे न्यायालयात आदेशाचे कथन करुन घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PANDURANG LIMBAJI GHULE
Date: 2026.02.21 17:30:29 +0530

दिनांकः– २१/०२/२०२६ (पां. लिं. घुले)
ठिकाणः– कराड २ रे सह दि. न्या. व. स्तर, कराड